नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०८/२०२५ (बुधवार)**

---

## आगामी येणाऱ्या सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता पारशिवणी पोलीस स्टेशन अंतर्गत काढला रूट मार्च आणि राबविली दंगा काबु योजना

आगामी येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद ए मिलाद या सणोत्सवचा बंदोबस्त असल्याने सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक २६/०८/२०२५ रोजी श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, रामटेक आणि पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पारशिवणी यांचे उपस्थितीत पारशिवणी पोलीसांनी रूट मार्च काढला. सदर रूट मार्च पोलीस स्टेशन, बॅक ऑफ इंडीया चौक, शिवाजी चौक, गांधी चौक, बाजार चौक ते परत पोलीस स्टेशन या मार्गाने घेण्यात आला. रूट मार्च दरम्यान गांधी चौक येथे दंगा काबू योजने बाबत सराव घेण्यात आला. सदर रूट मार्च व दंगा काबू योजनेत पोलीस स्टेशन पारशिवणी तसेच रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक, अरोली, देवलापार येथील अधिकारी आणि अंमलदारांसह दंगा नियत्रंण पथक आणि गृहरक्षक उपस्थित होते. रूट मार्च आणि दंगा काबु योजना राबवुन नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे जनतेने सणोउत्सव आनंदाने, निर्भयतेने तसेच शांततेत साजरा करण्याबाबत आवाहान करण्यात आले आहे.




POLICE
MAHARASHTRA
POLICE
MAHARASHTRA
POLICE
MAHARASHTRA
POLICE

## ५ वर्षापासुन मिळुन येत नसलेल्या अपहरण झालेल्या बेपत्ता मुलीचा घेतला शोध अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण आणि कोंढाळी पोलीस यांची संयुक्त यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कोंढाळी येथे दिनांक १२/११/२०२० रोजी अप क्र ४२५/२०२० कलम ३६३,३७० भा.द.वि अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा खुप प्रयत्न करून सुध्दा ५ वर्षापासुन शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्‌दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष ,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखेडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास करीत सोशल मिडीया, तांत्रिक पुरावे तसेच गोपनिय बातमीदार यांच्या माध्यमातुन माहीती काढुन सदर मुलीचा पत्ता शोधला आणि त्याबाबत सविस्तर माहीती कोंढाळी पोलीसांना दिली. कोंढाळी पोलीसांनी तात्काळ पोलीस पथक पाठवुन आज दिनांक २७/०८/२०२५ रोजी नमुद गुन्हयातील अपहृत मुलीला बोरगाव मेघे जि. वर्धा येथुन ताब्यात घेतले आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास कोंढाळी पोलीस करीत आहे.

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू बाळगणाऱ्या/विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ४६ गुन्हे नोंद एकुण ७३६२५ /— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त

**नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २६/०८/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री, आणि सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू ,मोहाफुल सडवा आणि विदेशी दारू असा एकुण ७३६२५/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे चंदु रामचंद्र उमाळे, वय ४३ वर्ष, धंदा. मजुरी रा दुधाळा ता.मौदा यांचे वर एक गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी क्रं १) महादेव गोदरु मोहणकर, वय ४५ रा काचुरवाही, २) अजय नामदेव नागपुरे, वय ३५ वर्षे, रा मंगळवारीवार्ड रामटेक, ३) अतुल शामराव झुरे, वय ३५, रा. सालई, ता पारशिवनी आणि एक महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे.,**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी क्रं १) कुजीलाल केशवराव खेडात, वय ४५वर्ष रा तुमडीटोला तह रामटेक आणि एका महीला

आरोपीवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे.**पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) बुदन भारत वरकडे, वय ५२ वर्ष रा.नागलवाडी ता.सावनेर जि.नागपुर,२) पुरूषोत्तम बापुराव धार्मिक, वय ५८ वर्ष रा. लांबटपुरा खापा ता सावनेर जि नागपूर, ३) आकाश बल्लुजी चौधरी, वय २९ वर्ष, रा. बडेगाव ता.सावनेर जि.नागपुर आणि १ महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद** येथे दोन महीला आरोपीतांवर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे दुर्वास रामकृष्ण लाहाबर, वय ४३ वर्ष रा. सुसुद्री ह.मु. डोरली ता. काटोल, याचे वर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे मूर्लीधर दुर्गाजी हटवार, वय ५६ वर्ष रा क्वार्टर न ०५,१६ मायनस क्वॉर्टर, डब्लु सी एल वाघोडा ता सावनेर याचे वर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी नामे १) मुकेश चिंतामण नागोसे, वय ४१ वर्ष रा. पचखेडी यांचे वर एक गुन्हा नोंद आहे , **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे १) विलास सखाराम नंदनवार, वय ४० वर्ष रा इतवारीपेठ उमरेड आणि दोन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे ज्ञानेश्वर लालचंद पवार, वय ३५ वर्ष रा पारधी बेडा चांपा आणि एका महीला आरोपीवर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन भिवापुर** येथे एका महीला आरोपीवर एक गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे १) प्रभुलाल मुन्नालाल जैस्वाल, वय ६२ वर्ष रा बेला वार्ड क्र. ०१ ता उमरेड जि नागपुर ,२) संदिप सोनबाजी गिरडे वय ३६ वर्ष रा चनोडा ता उमरेड जि नागपुर यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे.**पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) रमेशराम उदगार महतो,वय ३७ वर्ष रा मराची ता ईद्रपथ, जि समस्तिपुर, राज्य बिहार, ह मु गोयल कंपनी,दुधा ,ताजि नागपुर,२) ईदल शंकर दांडेकर, वय ५० वर्ष रा. बोरखेडी रेल्वे ता. जि नागपुर,३) शंकर कवडुजी पारसे,वय ३३ वर्ष रा.बट्टीबोरी वार्ड नं ०३ ताजि नागपुर, ४) नविनकुमार विश्वनाथ प्रसादराव यादव ,वय ४७ वर्ष रा वार्ड नं ०२ बुटीबोरी ताजि नागपुर,५) अंभिर सुधाकर काकडे,वय ३५ वर्ष रा धवळपेट,ता.जि नागपुर,आणि दोन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे.**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** राहुल लहुजी रामटेके, वय ४० वर्ष रा.सालईधाबा ता.हिंगणा जि.नागपुर याचेवर गुन्हा नोंद आहे.**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) प्रकाश महादेव ढोक, वय ४१ वर्ष रा. भूगाव ता. कामठी, २) उकुंडराव शामरावजी भिसे, वय ६७ वर्ष रा. टेमसना ता. कामठी ,३) भगवान रामदास करंजेकर, वय ३८ वर्ष रा. गरदेव चौक मौदा एका महीला आरोपी वर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे १) अर्जुन श्रीचंद शेंडे, वय ३५ वर्ष,रा. खंडेलवाल नगर सत्रापुर कन्हान यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) भिमराव शामराव गजभिये, वय ७० वर्ष रा खरसोली ता नरखेड २) प्रमोद लक्ष्मनराव ठोंबरे, वय ३० वर्ष रा बेलोना ता नरखेड, ३) सचिन चंद्रभान गोंडाने, वय ३४ वर्ष रा वार्ड क्र ०३ नरखेड ता नरखेड, ४) योगेश श्रावण कवडती, वय ३२ वर्ष रा चौरखैरी ता नरखेड, ५) संजय रामु धूर्वे , वय ४९ वर्ष रा शेमडा ता नरखेड, ६) यांचेवर प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे.**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) शेख ईसराईल शेख जबार ,वय ६५ वर्ष रा. पेठबुधवार काटोल, ,२) आनंद उंकडराव काळबांडे, वय ६० रा. येरला धोटे, ३) कृष्णा बळवंतराव नेहारे, वय ३५ रा.आंजनगाव ता. काटोल आणि एका महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे.

**अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ४६ गुन्हे दाखल केले आहे.**

# पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत खुन करणाऱ्या आरोपीस अटक

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— नमुद गुन्हयातील मृतक लालु आसाराम ऐकनाथ, वय ४६ वर्ष रा. सरोदी टोला पारशिवनी आणि आरोपी नामे लालु रानु भोयर, रा.सरोदी टोला पालोरा ता. पारशिवनी यांची शेती एकमेकांना लागुन असुन शेतीत पाणी सोडण्याचे जुन्या वादावरून दिनांक २६/०८/२०२५ रोजी जखमी हा त्याचे मोपेड गाडीने पारशिवनी ते सावनेर रोडनी त्याचे घराकडे जात असतांना पारशिवनी ते सावनेर रोड वर ग्रामिण रूग्नालय समोर आरोपीने त्याचे मारोती ८०० कारने मागुन जखमीचे मोपेड गाडीला धडक दिली व जखमी जमीनीवर खाली पडल्यावर आरोपीने तलवारीने वार करून त्याला जखमी केले. उपचारादरम्यान मॅक्स हॉस्पीटल, नागपुर येथे मृतक लालु आसाराम ऐकनाथ हे मयत झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी शुभम लालु एकनाथ, वय १८ वर्ष रा.सरोदी टोला पारशिवनी,यांचे रीपोर्ट वरून पोस्टे पारशिवणी येथे आरोपीविरूद्ध कलम १०३ (१), १०९(१), भा.न्या.सं सह कलम ४,२५ भा.ह.का अन्वये गुन्हा नोंद केला असुन **आरोपीस पोलीसांनी अटक केली आहे. नमुद आरोपीला मा.न्यायालयाने दिनांक ०२/०९/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**

# विज पडुन मृत्यु

**पोलीस स्टेशन सावनेर :—** पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा धापेवाडा शिवार येथे आज दिनांक २७/०८/२०२५ रोजी १५.०० वाजेच्या सुमारास प्रकाश शंकर पाटील यांचे शेत सर्वे क्रमांक ११७ या शेतात १. श्रीमती वंदना प्रकाश पाटील, वय ४२ वर्ष, रा धापेवाडा २. ओम प्रकाश पाटील, वय २२ रा धापेवाडा ३. निर्मला रामचंद्र पराते, वय ६५ वर्ष, रा. धापेवाडा यांचा वीज पडून मृत्यु झाला. सदर प्रकरणी सावनेर पोलीस चौकशी करीत आहे.

## पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत दाखल अपराध क्रमांक ५१२/२०२५ आणि अपराध क्रमांकं ५६१ /२०२५ बाबत...

दिनांक २२/०८/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात **बेगुनाहोंपे मामला दर्ज करने का लागाया आरोप** या मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली आहे.तसेच दिनांक २३/०८/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात **पोलीस अधिकाऱ्यांविरूध्द मानहानीचा दावा** या मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली आहे. नमुद प्रकरणी पोलीस स्टेशन कन्हान येथे दिनांक २४/०७/२०२५ रोजी अप क्रमांक ५१२/२०२५ कलम ३(आर)३(१)(एस) अनु.जा.ज.अ.प्र.अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर दिवशी घडलेल्या घटनेचा अनुषगांने दिनांक १५/०८/२०२५ रोजी अप क्र ५६१/२०२५ कलम ७४,७५,७६,२९६,३५१(२) भा.न्या.सं अन्वये विनयभंगाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन्ही प्रकरण पोलीस तपासावर आहे.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २६/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २८/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री सागर खर्डे सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. सावानेर उपविभागात खपा पोस्टे अंतर्गत खापा टाउन, बडेगाव ,कोदेगाव येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि सदर कोबिंग ऑपरेशन श्री सागर खर्डे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. फॉरेस्ट नाका येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार यांच्या सोबत दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार हजर होते.




GOODS CARRIER
EICHER

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने